प्रेसनोट दि. १३/०१/२०१८

**आंतरराष्ट्रीय कॉल सेंटरवर साबयर सेलचा छापा, ॲपलचे बोगस टेक सपोर्टच्या माध्यमातुन अमेरिकन नागरीकांची फसवणुक करणारी टोळी गजाआड**

दि.११/०१/२०१८ रोजी गोपनिय सुत्राकडुन सायबर क्राईम सेल यांना पुणे खराडी येथे पाचवा मजला सिटी विस्टा, फाऊटंन रोड, खराडी पुणे येथे व्हि टेक सोल्युशन नावाने चालु असलेल्या कॉल सेंटर मध्ये अमेरिका देशामधील नागरीकांना त्यांच्या ॲपल मोबाईल व आयपॅडवर वापरण्यात येणाऱ्या सफारी ब्राऊझरवर (POPUP) जनरेट करुन त्यांचे डिवाईस क्रॅश झाले असुन त्यांची हि समस्या सोडवुन देतो असे सांगुन संबधितांना ॲपल आय टयुन कार्ड खरेदी करण्यास लावुन त्यांचा क्रमांक त्यांचेकडुन घेवुन त्यांची लाखो रुपयांची फसवणुक केली जात असल्याची माहीती मिळाली,

त्यावरुन सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांनी सदर कॉल सेंटरवर छापा टाकुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सायबर सेल कडील पोनि. गजानन पवार, सपोनि.सागर पानमंद व कर्मचारी तसेच सामाजिक सुरक्षा विभागचे पो.नि. संजय पाटील यांचेसह पाचव्या मजल्यावर ५१५, सिटी विस्टा, फाऊटन रोड, खराडी, पुणे. येथे व्हि टेक स्क्वेअर नावाचे कॉल सेंटर चालु मिळुन आले सदर कॉलसेंटर इसम नामे आदित्य काळे व रोहित माथुर हे दोघे भागीदारीमध्ये चालवित असल्याचे तसेच सदर कॉलसेंटरमध्ये अमेरिकेमधील ॲपलचे मोबाईल व आयपॅड वापर करणारे नागरिकांना त्यांचे ते वापर करताना ब्राऊजर वर त्यांचे डिवाईसमध्ये एरर/सिस्टिम क्रॅश झाले असलेबाबतचा मेसेज (POPUP) पाठवुन त्यावर ADSTERRA.COM मार्फत फोन करण्यास भाग पाडले जाते. त्यानंतर सदर कॉलसेंटरमधुन अमेरिकन व्यक्तीस त्याची समस्या सोडविण्याकरिता आयटयुन कार्ड किंमत अंदाजे १०० यु एस डॉलर विकत घेण्यास लावुन त्या आयटयुन कार्डचा नंबर त्याचेकडुन घेतात. सदर आयटयुन कार्डचे नंबर आदित्य काळे व रोहित माथुर एकत्रित करुन त्यांचा राजस्थान येथील साथीदाराचे व्हॉटस्ॲप मोबाईल क्रमांकावर पाठवित असत. सदर आयटयुन कार्डच्या माहितीच्या बदल्यात तो त्याचे कमिशन वजा करुन सदर कॉलसेंटर व्हि टेक स्क्वेअरचे बॅक खात्यावर जमा करीत असे अशा प्रकारे त्यांनी अंदाजे १७५ अमेरिकन नागरिकांची मिळुन एकुण १०,५०,०००/- रुपयांची फसवणुक केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन आले. तसेच सदर कॉलसेंटर हे विनापरवाना चालु असल्याचे मिळुन आल्याने सदर कॉल सेंटरमधुन एकुण **६ हार्डडिस्क, १ लॅपटॉप, वायफाय राऊटर, ५ हेडसेट** जप्त करण्यात आला आहे. सदरबाबत सरकारतर्फे सायबर सेलचे सहा. पोलीस निरीक्षक, सागर पानमंद यांनी चंदननगर पोलीस स्टेशन येथे १)आदित्य काळे, २) रोहित माथुर व राजस्थान येथील त्यांचा साथीदार यांचेविरुध्द तक्रार दिल्याने **चंदननगर पो.स्टे. गुन्हा रजि. नं. १३/२०१८ भादंवि.कलम ४२०, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(डी), ७५ अन्वये** गुन्हा दाखल करण्यात आहे.

पोनि.गजानन पवार यांनी दाखल गुन्हयातील आरोपी १)आदित्य काळे, २) रोहित माथुर यांना अटक केली असुन त्यांचेकडुन **एकुण ३ मोबाईल हस्तगत** करण्यात आले आहेत. त्यांचेकडे केले तपासामध्ये आरोपी यांनी मिळुन अंदाजे १५०० अमेरिकन लोकांना पॉपअप पाठवुन कॉल केल्याचे निष्पन्न झाले असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक गजानन पवार हे करीत आहेत.

सदर कारवाई सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक - गजानन पवार सायबर क्राईम सेल, पोलीस निरीक्षक - संजय पाटील सामाजिक सुरक्षा विभाग व सायबर क्राईम सेलकडील पथक सपोनि. सागर पानमंद, पोउनि - किरण औटे, सोनाली फटांगरे, पोशि- राजकुमार जाबा, प्रसाद पोतदार, अनिल पुडंलिक, संतोष जाधव, मितेश शेलार, शिरीष गावडे, मपोशि शुभांगी मालुसरे, शितल वानखेडे यांचे पथकाने केली.